# निसर्ग किमया

बीज पडले भूवरी
थेट शिरले अंतरी
मृदू मृदा भू पांघरी
निजे रूजे बीज घरी ||१||

वर्षा बीजा न्हाऊ घाली
सूर्य दादा ऊब देई
नदी खाऊ पिऊ घाली
फुटे कोंब वर येई ||२||

कोंब होई वृक्ष मोठा
गर्द पर्णी दीर्घ शाखा
पुष्पी फळी मध साठा
खग कपी सर्प सखा ||३||

प्राणीमात्रा छाया देई
शुध्द भोवताल करी
अपेक्षा न काही ठेवी
सुज्ञ जनां पूज्य होई ||४||

– नारायण
१०/१०/२३